सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-422222

दूरध्वनी : 0253-2230580, 2230734 फॅक्स :2231716

संकेतस्थळ : http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : nondani@ycmou.digitaluniversity.ac, coe@ycmou.digitaluniversity.ac

ज्ञानगंगा घरोघरी

**परीक्षा व नोंदणी विभाग**

जा.क्र. : पनिका/नोंदणी/2017/ दिनांक : 25.06.2017.

**प्रति,**

मा. प्राचार्य / केंद्रसंयोजक,

य.च.म.मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र,

द्वारा -..............................................

**विषय - शैक्षणिक सत्र 2017-18 : सर्व शिक्षणक्रम ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत...**

**महोदय,**

आपल्या महाविद्यालयात अथवा आपल्या संस्थेत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे वेगवेगळ्या शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र कार्यरत आहे. शैक्षणिक सत्र 2017-18 साठी आपल्या अभ्यासकेंद्रावरील विद्यार्थ्यांसाठीचे प्रवेश ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पध्दतीने करावयाचे आहेत. मागील वर्षाप्रमाणे ह्या वर्षी देखील आपण ऑनलाईन प्रवेशासाठी सहकार्य करीत असल्याबद्दल आपले प्रथमतः आभार !

1. विद्यापीठ आनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या मान्यतेन्वये आणि विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयान्वये शैक्षणिक सत्र 2017-18 साठी विद्यापीठातर्फे कार्यरत असलेल्या आणि विद्यापीठाने दिनांक 25.06.2017 रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील विद्याशाखानिहाय, विविध शिक्षणक्रमांचे प्रवेश लगेचच सुरू होत आहेत. याव्यतिरिक्त नवीन शिक्षणक्रमांना प्रवेश सध्यातरी होणार नाहीत.
2. सर्व शिक्षणक्रमांची प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. ऑनलाईन प्रवेश करताना विद्यार्थी, अभ्यासकेंद्र प्रतिनीधी अथवा पालक यांनी खालील बाबींकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावे कि जेणेकरून आपल्या प्रवेशात येणाऱ्या अडचणी आपोआप दूर होतील व आपला प्रवेश योग्य पध्दतीने होईल.
3. आपल्या ऑनलाईन प्रवेशात काही अडचण आल्यास आपल्या जवळच्या विभागीय केंद्राशी अथवा विद्यापीठ मुख्यालयात हेल्पलाईनशी (0253-2230580, 2230734) दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करून आपली अडचण प्रवेशासाठी दूर करता येईल. तसेच nondani@ycmou.digitaluniversity.ac ह्या मेलवर आपली अडचण कळवून अडचणीवर मदत घेऊ शकता.
4. शैक्षणिक सत्र 2017-18 साठी सर्व प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाईन पध्दतीने आपण प्रथमतः विद्यापीठ संकेतस्थळ **http://ycmou.digitaluniversity.ac** वर भेट द्यावी. ह्यावर शैक्षणिक सत्र 2017-18 साठी ऑनलाईन प्रवेश ह्यावर क्लिक करून प्रवेशाबाबत माहिती घेऊ शकता. तसेच विद्यापीठाच्या होमपेजवर **ऑनलाईन प्रवेशासाठी येथे क्लिक करा या चित्रावर क्लिक** करून प्रवेशाची माहिती मिळू शकते.

5. विद्यार्थी अथवा अभ्यासकेंद्रास विद्यार्थ्यांचे प्रवेश करण्यासाठी प्रथमतः आपणांस ज्या शिक्षणक्रमाला प्रवेश करावयाचा आहे, त्यासाठी विद्यापीठाच्या होमपेजवर **Admission अथवा Prospectus 2017-18** ह्या टॅबवर जाऊन विविध विद्याशाखानिहाय माहितीपुस्तिका उपलब्ध आहेत. माहितीपुस्तिकेतील आवश्यक तेवढी माहिती (उदा. शिक्षणक्रम प्रवेश पात्रता, कालावधी, शुल्क, अभ्यासक्रम निवड निश्चिती, मूल्यमापन इत्यादी) वाचन करावी व आपल्या संदर्भासाठी प्रिंट काढून घ्यावी. ह्यामध्ये वार्षिक वेळापत्रक दिलेले असून त्याचे वाचन करावे व त्याप्रमाणे कार्यवाही होणे अपेक्षित आहे.
6. विद्यार्थ्याला अथवा अभ्यासकेंद्रांला स्वतंत्र माहितीपुस्तिकेसाठी शुल्क जमा करण्याची अथवा कोणाकडे देण्याची गरज नाही कारण विद्यापीठाने माहितीपुस्तिकेच्या सर्व बाबी **ऑनलाईनला मोफत उपलब्ध करून दिलेल्या आहेत.** अभ्यासकेंद्राला देखील पूर्वीप्रमाणे माहितीपुस्तिका विभागीय केंद्रावरून घेऊन जाणे व हिशेब जमा करणे या गोष्टींची गरज नाही.
7. विद्यार्थ्याने अथवा अभ्यासकेंद्रांने ऑनलाईन प्रवेश करताना माहितीपुस्तिका वाचून खात्री झाल्यानंतर विद्यापीठाच्या संकेतस्थळावर असलेले **Presentation** ह्या टॅबमधील माहिती वाचून ऑनलाईन प्रवेश करावयाचा आहे.
8. ऑनलाईन प्रवेश करताना विद्यापीठाची साईट उघडल्यानंतर दोन चौकटी असलेले पान येते. त्यामध्ये ज्या विद्यार्थ्याकडे आपल्या विद्यापीठाचा 16 अंकी कायमनोंदणी क्रमांक नाही **(Unregistered Students)** त्यांनी पहिल्या चौकटीला क्लिक करून नवीन विद्यार्थी म्हणून प्रवेश करावयाचा आहे.
9. तसेच ज्या विद्यार्थ्याकडे आपल्या विद्यापीठाचा 16 अंकी कायमनोंदणी क्रमांक आहे **(Registered Students)** त्यांनी दुसऱ्या चौकटीला म्हणजे 16 अंकी कायमनोंदणी क्रमांकाच्या चौकटीला क्लिक करून प्रवेश करावयाचा आहे. **त्यांनी नवीन विद्यार्थी म्हणून प्रवेश करण्याची गरज नाही अन्यथा एकाच विद्यार्थ्यांस नवीन कायमनोंदणी क्रमांक मिळून दोन-दोन कायमनोंदणी मिळाल्यास प्रवेश चुकीचा होईल व त्याचा परिणाम त्याच्या परीक्षा आणि गुणपत्रकावर होईल तसेच पदवी मिळण्यास देखील अडचण होईल.**
10. ऑनलाईनला प्रवेश करताना आपणांस प्रोफाईल पूर्ण भरल्यानंतर प्रथमतः **OTP** मिळतो. सदरचा **OTP** आपल्या मोबाईल आणि ई-मेलवर येतो. तो आपण जतन करून ठेवावा किंवा तात्काळ बदल करावा कारण तो ऑटो जनरेट असल्याने काही वेळानंतर तो आपोआप बंद पडतो. त्यानुसार आपली माहिती भरून प्रवेश करता येऊ शकतो.
11. ऑनलाईन प्रवेश करताना विद्यार्थ्याला यापूर्वी मिळालेला कायमनोंदणी क्रमांक हा आपला युजर आयडी असेल आणि आपली जन्मदिनांक हा आपला पासवर्ड **(उदा. 13.02.1990 जन्म दिनांक असल्यास 900213 अशाप्रकारे पासवर्ड)** असतो. आपण मागील वर्षी प्रवेश करताना वापरल्यानुसारच युजर व पासवर्ड टाकल्यास आपली प्रोफाईल उघडली जाईल. त्यानंतरच प्रवेश करता येईल.
12. कायमनोंदणी क्रमांक असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश करताना युजर आयडी जर आपला पासवर्ड आठवत नसेल **फरगॉट पासवर्डवर क्लिक** करून पुढील माहिती भरून आपला पासवर्ड मिळावावा आणि नंतरच प्रवेश करण्यात यावा.
13. आपला युजरआयडी व पासवर्डन्वये प्रवेश करता आला नाही तर विद्यापीठाशी संपर्क करूनच आपला प्रवेश करावयाचा आहे. अन्यथा आपला प्रवेश चुकू शकतो. प्रवेश चुकीचा झाल्यास त्यास विद्यार्थी अथवा प्रवेश करणारी व्यक्ती जबाबदार असेल त्यामुळे प्रवेश घेताना सर्व बाबींची काळजी घ्यावी. चुकीच्या प्रवेशास विद्यापीठ जबाबदार असणार नाही.

14. आपणांस ज्या शिक्षणक्रमाला प्रवेश करावयाचा आहे त्यासाठी विद्यापीठाच्या होमपेजवर Study Centers ह्या टॅबवर जाऊन आपल्या आवडीनुसार शिक्षणक्रमनिहाय अभ्यासकेंद्र सूची आपणांस पहाता येऊ शकेल.
15. आपल्या आवडीच्या शिक्षणक्रमाची माहितीपुस्तिका वाचून आपल्या शहरातील जवळच्या अभ्यासकेंद्राला भेट द्यावी. अभ्यासकेंद्रावर आपणांस आवश्यक असलेली माहिती मिळाल्यानंतर आणि प्रवेशाबाबत आपले समाधान झाल्यानंतरच आपणास ऑनलाईन प्रवेश करता येऊ शकेल.
16. ऑनलाईन प्रवेश करताना आपल्या प्रोफाईलमधील माहिती काळजीपूर्वक वाचून भरा. त्यातील आपले संपूर्ण मराठी व इंग्रजी नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी, पीनकोड नंबर इत्यादी गोष्टी काळजीपूवर्क भराव्यात. ह्यात चुका होणार नाही याची काळजी घ्या.
17. प्रवेशाच्या वेळी प्रोफाईलमध्ये टाकलेला मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडी **शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंत बदलता येणार नाही.** जर वारंवार बदल केला तर आपणांस येणारे दूरध्वनीवरील मेसेज अथवा ई-मेल विद्यापीठाकडून मिळणार नाही.
18. आपला प्रवेश इलिजिबीलीटी विभागामार्फत पात्र झाल्यानंतर आपणांस आलेल्या एसएमएसनुसार आपली प्रोफाईल तसेच **अॅडमिशन स्टेटस** तपासून पहावा. त्यामध्ये **आपला प्रवेश पात्र असल्यास अॅप्रुव्हड आणि अपात्र असल्यास रिजेक्टेड** असा शेरा दिसेल.
19. विद्यार्थ्यांचा प्रवेश अपात्र अथवा पात्र झाल्यास विद्यार्थ्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर एसएमएस पाठविण्यात येतो त्यामुळे विद्यार्थ्यांनी त्याची तात्काळ नोंद घेणे आवश्यक आहे. तसेच त्यानुसार आपल्या फ्रोफाईला आलेला शेरा वाचून योग्य ती कार्यवाही करणे अपेक्षित आहे.
20. संबंधित ऑनलाईन प्रवेशात दुरूस्ती असल्यास आपणांस विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील अनाऊंसमेंट आणि न्यूज व इव्हेंटस टॅबमध्ये दिलेल्या नोटिफिकेशननुसार, विद्यापीठाच्या धोरणानुसार प्रकिया शुल्क रूपये 300/- चा धनाकर्ष फायनान्स ऑफिसर, वायसीएमओयु, नाशिक यांचे नावे काढून त्या धनाकर्षामागे विद्यार्थ्याचे नाव, प्रवेश अर्ज क्रमांक, मोबाईल क्रमांक, पीआरएन इत्यादी माहीती लिहून, विद्यार्थ्याचा विनंती अर्ज, दुरूस्तीसाठी पुराव्यासह कागदपत्रे मा. परीक्षा नियंत्रक, यचममुवि, नाशिक यांना पाठवून दुरूस्ती करावी लागणार आहे.
21. प्रोफाईलमध्ये काही दुरूस्ती असल्यास विद्यापीठातर्फे संकेतस्थळावर दिलेले नोटिफिकेशन वेळोवेळी तपासून घ्यावे व त्यानुसार कार्यवाही वेळेत करणे आपणांवर बंधनकारक असेल. नोटिफिकेशननुसार वेळेत पूर्तता न केल्यास विद्यापीठ जबाबदार असणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.
22. आपल्या प्रोफाईलन्वये आपणांस गुणपत्रक, पासिंग सर्टिफिकेट, पदवी/पदविका/पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र आपल्या नोंदणीकृत घरच्या पत्त्यावर पाठविण्यात येणार आहेत. त्यामुळे आपल्या प्रोफाईलमधील माहिती काळजीपूर्वक भरणे आवश्यक आहे.
23. ऑनलाईन प्रवेश करताना प्रोफाईल सोबतच शैक्षणिक पात्रतेची आवश्यक तेवढीच कागदपत्रे, आपला स्वतःचा फोटो, स्वाक्षरी अचूक स्कॅन करणे आवश्यक आहे. स्कॅन कशा स्वरूपाचे असावे ह्याबाबत संबंधित ठिकाणी सूचना दिलेल्या आहेत त्यानुसार स्कॅम करण्यात यावेत. प्रवेशासाठी विद्यार्थ्याला कोणत्याही स्वरूपाचे मूळ कागदपत्रे जमा करण्याची गरज नाही मात्र स्वतः अटेस्टेड केलेली कागदपत्रे स्कॅन करणे आवश्यक आहे.
24. विद्यार्थ्याला अथवा अभ्यासकेंद्राला प्रवेश करताना काही तांत्रिक अथवा ऑनलाईनबाबत काही अडचण आल्यास विद्यापीठाशी संपर्क करून आपली माहिती उपलब्ध करून घेऊ शकता अथवा प्रवेशासाठी मदत घेऊ शकता.

**25.** विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार शैक्षणिक सत्र 2015-16 व 2016-17 प्रमाणे विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशासाठी द्यावयाच्या सेवांबद्दल आणि तत्सम सेवांचे दर प्रत्येक विद्यार्थ्याकडून प्रवेशाची डाटा एन्ट्री करण्यासाठी रूपये 40/- व बँक ट्रँझॅक्शनसाठी रूपये 40/- मिळून एकूण रूपये 80/- सेवा कर घ्यावयाचा आहे. ही रक्कम विद्यापीठाने निश्चित केलेली आहे. तसेच शक्य असेल तर अभ्यासकेंद्रांनी देखील ह्याच दराने प्रवेश नोंदणी केल्यास कोणतीही अडचण नाही. ह्या व्यतिरिक्त अधिकची रक्कम विद्यार्थ्यांकडून घेण्यात येऊ नये.

26. पूर्वतयारी शिक्षणक्रमासाठी प्रवेश करताना विद्यार्थ्याचे वय 18 वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. पूर्वतयारी शिक्षणक्रमाची परीक्षा ऑनलाईन होणार असल्याने ती अत्यंत सोपी असणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यास जुजबी संगणकाचे ज्ञान असणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यास परीक्षेसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर मॉकटेस्ट दिलेली असणार आहे.

27. शैक्षणिक सत्र 2016-17 वर्षांप्रमाणे पूर्वतयारी शिक्षणक्रम प्रवेशासाठी जास्तीत जास्त विद्यार्थी संख्या मिळविण्याच्यादृष्टीने प्रयत्न करावेत कि जेणेकरून सदरचे विद्यार्थी आपल्या अभ्यासकेंद्रासाठी तीन वर्षे प्रवेशार्थी म्हणून मिळणार आहेत.

**28. पूर्वतायरी जूलै-सप्टेंबर च्या तकडीच्या विद्यार्थ्यांना लगेचच उत्तीर्ण होताच प्रथम वर्षास प्रवेश मिळणार असल्याने त्यांचे वर्ष वाया जाणार नाही.**

29. मात्र 12 वी उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यास त्याच्या गुणपत्रक आणि शाळा सोडल्याच्या दाखल्यावर प्रथम वर्षास प्रवेश मिळेल त्यासाठी 18 वर्षाची अट असण्याची गरज नाही.

30. आपल्या प्रोफाईलमध्ये काही बदल करावयाचा असल्यास तो ऑनलाईन शुल्क भरण्यापूर्वी केल्यास तो बदलता येऊ शकेल मात्र शुल्क भरून झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत बदल होणार नाही त्यामुळे प्रोफाईल काळजीपूर्वक भरावी.

31. द्वितीय व तृतीय वर्षाचे प्रवेश करताना विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम निवड माहितीपुस्तिकेतील गटानुसार करावी. त्यात चुका होणार याची काळजी घ्यावी. सॉफ्टवेअरमध्ये योग्य तो गट निवडीबाबत सूचना टाकलेल्या आहेतच तरी पण अभ्यासक्रम निवड काळजीपूर्वक करावी की जेणेकरून नंतर बदल करण्याची गरज येणार नाही.

32. **द्वितीय आणि तृतीय वर्षात यापुढे श्रेयांकातर नियमान्वये** प्रवेश होणार नाहीत. त्याऐवजी **सरळ प्रवेश** होतील याची विद्यार्थ्यांना कल्पना द्यावी.

**33. विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयान्वये आणि युजीसीच्या निर्देशान्वये डी.एड. अथवा कोणत्याही शाखेतील 2 किंवा 3 वर्षाचा पदविका शिक्षणक्रम पूर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांस द्वितीय वर्षासाठी सरळ प्रवेश मिळणार नाही. संबंधित विद्यार्थ्यांना प्रथम वर्षासाठी प्रवेश देण्यात यावा.**

**34. बी.ए. साहित्य सुधाकर परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांस तृतीय वर्षास सरळ प्रवेश देऊ नये. संबंधितास द्वितीय वर्षास प्रवेश मिळू शकेल. त्याचप्रमाणे एम.ए. (पदव्युत्तर सर्व शिक्षणक्रम), एम.बी.ए., बी.लीब., एम.लीब., बी.एड., शालेय व्यवस्थापन पदविका इत्यादी शिक्षणक्रमासाठी प्रवेश देण्यात येऊ नये. विद्यार्थ्यानी प्रवेश केल्यास सदर प्रवेश चुकीचा झाल्याने अपात्र होईल.**

35. नियमित अथवा सरळ प्रवेश करताना विद्यार्थ्यांकडून काही चुकीच्या बाबी अथवा चुकीची कागदपत्रे प्रवेशाच्या ठिकाणी जोडल्यास आणि पात्रता तपासताना चुकीची बाब लक्षात आल्यास प्रवेश रद्द होऊ शकेल. त्यामुळे माहितीपुस्तिकेप्रमाणे नियम व पात्रता पाहूनच प्रवेश करावयाचा आहे.

36. प्रवेश ऑनलाईन करताना योग्य ते  शुल्क ऑनलाईनद्वारेच विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे भरणे आवश्यक आहे.
37. प्रवेश शुल्काची **विद्यापीठ हिस्स्याची रक्कम** ही विद्यार्थ्याला पूर्णपणे **ऑनलाईननेच नेट बँकीगद्वारे भरावयाची आहे**. त्यासाठी स्वतःचे, पालकाचे अथवा इतर कोणत्याही नातेवाईकाचे खात्यावरून रक्कम ऑनलाईन भरू शकतो.
38. ऑनलाईन प्रवेश अर्ज अथवा शुल्क भरताना शक्यतो मोबाईलद्वारे नेटबँकींग करताना रेंजची अडचण येते आणि पेमेंट फेल अथवा रिस्पॉन्स नॉट रिसिव्हड फ्रॉम बँक असा मेसेज येतो व आपला प्रवेश होत नाही.  त्यामुळे इंटरनेटची रेंज व्यवस्थित असलेल्या ठिकाणाहूनच प्रवेश करण्याचा प्रयत्न करावा.
39. कोणत्याही बँकेत विद्यापीठाच्या यापूर्वीच्या चलनाने शुल्क भरू नये अथवा रोखीने बँकेत वा इतरत्र भरणा करू नये. ऑनलाईन व्यतिरिक्त पैसे भरणा केल्यास व प्रवेश न झाल्यास विद्यार्थी स्वतः जबाबदार असेल.
40. प्रवेश शुल्कातील अभ्यासकेंद्र हिस्सा अभ्यासकेंद्रावर भरावयाचा आहे. तसेच प्रवेश अर्जाची ऑनलाईन प्रिंट प्रत अभ्यासकेंद्रावर जमा करावयाची आहे. प्रवेश अर्ज व शुल्क जमा केल्यानंतर आपणांस अभ्यासकेंद्राकडून अध्ययन साहित्य मिळणार आहे.
41. अभ्यासकेंद्र हिस्स्याची रक्कम विद्यार्थ्यांकडून अभ्यासकेंद्राने शैक्षणिक सत्र 2015-16 आणि त्यापूर्वीच्या पध्दतीप्रमाणे परस्पर भरून घ्यावयाची आहे. त्याची पावती अथवा चलनाची एक प्रत विद्यार्थ्याला देण्यात यावी.
42. विद्यार्थ्याचा प्रवेश होताच त्याची पुस्तके पूर्वीच्या पध्दतीप्रमाणे त्याच्या नोंदणीकृत अभ्यासकेंद्रावरून मिळणार आहे. म्हणजे विद्यापीठ प्रवेशित विद्यार्थ्यांची पुस्तके अभ्यासकेंद्रावर पाठविणार आहे. पुस्तके देखील दोन टप्प्यात पाठविण्यात येतील.
43. मोबाईल अँपबाबत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. आपल्या मोबाईलवरून विद्यार्थी सदरची माहिती स्वतः पाहू शकेल.
44. प्रवेश पात्रतेची सर्व कागदपत्रे अटेस्टेड असली पाहिजेत, त्यात पात्रता तपासताना तफावत आढळून आल्यास संबंधिताचा प्रवेश रद्द करण्यात येईल. त्यामुळे कागदपत्रे स्कॅन करताना काळजी घ्यावी, पीडीएफ फाईल अपलोड करू नये त्याऐवजी जेपीजी फाईल्स अपलोड करावी. तसेच ह्यामुळे प्रवेश रद्द झाल्यास अथवा चुकीची पात्रता असल्यास त्याचे शुल्क विद्यापीठाकडून परत मिळणार नाही याची कल्पना विद्यार्थ्यांना द्यावी. याचे सर्व अधिकार विद्यापीठाकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.
45. शैक्षणिक पात्रतेच्या कागदपत्रांअभावी अथवा त्रुटीअभावी प्रवेश अपात्र झाल्यास तात्काळ आपल्या मोबाईलवर एसएमएस पाठविण्यात येत असतो त्यामुळे विद्यापीठाकडून आलेल्या एसएमएस अथवा ई-मेलवर लक्ष ठेवावे. तसेच अपात्र विद्यार्थी यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अनाऊंसमेंट अथवा न्युज टॅबमध्ये असलेल्या नोटिफिकेशनवर पहावी ववेळेत योग्य ती कार्यवाही करावी व आपला प्रवेश कायम झाल्याबाबतची माहिती ऑनलाईन आपल्या प्रोफाईलद्वारे तपासणी करून घेण्यात यावी.
46. अंध, कैदी (बंदी) बांधव, आत्महात्याग्रस्त शेतकऱ्यांची पाल्ये ह्यांना विद्यापीठ  शुल्कात सवलत असल्याने अभ्यासकेंद्र प्रतिनीधीनींच संबंधिताचे अर्ज ऑफलाईन भरून सर्व शैक्षणिक पात्रतेच्या कागदपत्रांसमवेत जमा करून घ्यावयाचे आहेत.  **अभ्यासकेंद्रांनी सदरचे प्रवेश अर्ज एकत्रितपणे जमा करून दिनांक 20.08.2017 पर्यंत** विद्यापीठाकडे स्पीड पोस्टाने अथवा हस्तपोच जमा करावयाचे आहे. त्यामुळे संबंधित प्रवेश अर्जास उशीर होणार नाही याची काळजी

घ्यावी. खालील तक्त्याप्रमाणे प्रवेश अर्ज व तत्सम कागदपत्रे विद्यार्थ्यांकडून जमा करून घ्यावयाचे आहेत.

| नं. | विद्यार्थी प्रवर्ग | नवीन प्रवेशार्थीसाठी | जुन्या विद्यार्थ्यांसाठी (उदा. 16 अंकी कायमनोंदणी क्रमांक असलेल्या विद्यार्थ्यांसाठी) |
|---|---|---|---|
| 1. | अंध | ऑफलाईन प्रवेश अर्ज, अंधत्वाचा सिव्हील सर्जन दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे. | ऑफलाईन प्रवेश अर्ज सर्व पूर्ततेसह आणि कायमनोंदणी क्रमांकाचा असल्याचे कागदपत्र. |
| 2. | बंदी बांधव | ऑफलाईन प्रवेश अर्ज, शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे, केंद्रसंयोजकांचे शिफारसपत्र. | ऑफलाईन प्रवेश अर्ज सर्व पूर्ततेसह आणि कायमनोंदणी क्रमांकाचा असल्याचे कागदपत्र. |
| 3. | आत्महात्याग्रस्त शेतकरी पाल्य | ऑफलाईन प्रवेश अर्ज, शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे, केंद्रसंयोजकांचे शिफारसपत्र. | ऑफलाईन प्रवेश अर्ज सर्व पूर्ततेसह आणि कायमनोंदणी क्रमांकाचा असल्याचे कागदपत्र. |

47. मागील वर्षाप्रमाणेच जास्तीत जास्त जाहिरात आपल्या परिसरात, शहरात करून जास्तीत जास्त प्रवेश करण्याचा अभ्यासकेंद्रांनी प्रयत्न करावा.
48. बी.एड., बी.एड. स्पेशल, एम.पी.एच, एम.बी.ए. कृषी इत्यादी शिक्षणक्रमांचे प्रवेश हे प्री अँडमिशन पध्दतीने होणार आहेत. त्यासाठी त्यांची स्वतंत्र लिंक (OASIS) देण्यात आलेली आहे. विद्यापीठाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे प्रवेश होतील. कोणत्याही शिक्षणक्रमाला प्रवेशाची मुदत वाढवून मिळणार नाही.
49. जे शिक्षणक्रम (विशेषतः 2 किंवा 3 वर्ष कालावधीचे) मागील वर्षी सुरू होते मात्र ह्या वर्षी पहिल्या फेजमध्ये युजीसीची मान्यता मिळालेली नाहीत त्यांचे प्रथम वर्ष आणि द्वितीय वर्षाचे सध्या प्रवेश होणार नाहीत. मात्र तृतीय वर्षाचे प्रवेश मात्र नैसर्गिक वाढीने होणार आहेत.
50. सर्व पदव्युत्तर शिक्षणक्रमांसाठी प्रवेश ऑनलाईन पध्दतीने आणि एकदाच होतील मात्र परीक्षा ही सत्र पध्दतीने होणार आहेत.
51. **विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार पदव्युत्तर शिक्षणक्रमांसाठी एका तुकडीसाठी किमान 60 विद्यार्थी संख्या निश्चित केलेली आहे. शैक्षणिक सत्र 2017-18 पासून प्रत्यके अभ्यासकेंद्राला प्रत्येक पदव्युत्तर शिक्षणक्रमासाठी 60 विद्यार्थी संख्या निश्चित करण्यात आलेली आहे.**
52. **आपल्या अभ्यासकेंद्रास पदव्युतर शिक्षणक्रमाची अधिकची तुकडी घ्यावयाची असल्यास विभागीय केंद्रामार्फत विद्याशाखा संचालकांची मान्यता घ्यावी, त्यानंतरच पुढील तुकडी ऑनलाईनला विद्यापीठामार्फत उपलब्ध करून दिली जाईल. याव्यतिरिक्त अधिकचे प्रवेश होणार नाहीत याची काळजी घ्यावी.**
53. शालेय व्यवस्थापन पदविका (डीएसएम) शिक्षणक्रमासाठी नोकरीत असल्याचे प्रमाणपत्र व मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र प्रत कागदपत्रांच्या ठिकाणी स्कॅन असणे आवश्यक आहे. अन्यथा प्रवेश पात्रतेत सदरचे प्रवेश रद्द करण्यात येतील.
54. पदवी प्राप्त विद्यार्थ्याला कोणत्याही फॉरेन लँ गवेज चा शिक्षणक्रम विद्यापीठाकडेउपलब्ध आहे.
55. विज्ञान व तंत्रज्ञान आणि निरंतर शिक्षण विद्याशाखेशी संबंधित विद्यार्थ्यांनी प्रवेश करताना एकाच वेळी दोन्हीही सत्रांचा ऑनलाईन प्रवेश करावयाचा आहे. शुल्क देखील एकाच वेळी सुरूवातीलाच दोन्हीही सत्रांचे भरावयाचे आहे.

56. महाराष्ट्र शासनाने मंजूरी केलेल्या आरक्षण प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीबाबतचे स्वतंत्रपणे नोटिफिकेशन दिलेले असून त्याचे काळजीपूर्वक वाचन करूनच आपल्या ऑनलाईन प्रवेशाची आणि शिष्यवृत्तीदाखल ऑनलाईन अर्जाची समाजकल्याण विभागाच्या वेबसाईटवरून कार्यवाही वेळेत करावयाची आहे. त्याशिवाय संबंधित विद्यार्थ्यांचा ऑनलाईन प्रवेश ग्राह्य होणार नाही.

57. शिष्यवृत्तीदाखल जमा केलेले प्रवेश अर्ज आणि शिष्यवृत्ती अर्ज आपल्या विद्यापीठाकडे उपकुलसिचव, आरक्षण कक्ष यांचेकडे वेळेत जमा करावयाचे आहेत.

58. मा. अभ्यासकेंद्र प्रमुख वा केंद्रसंयोजकांना विनंती की, उपरोक्त पत्रातील मुद्यांनुसार आपल्या अभ्यासकेंद्रावरील विद्यार्थ्यांचे प्रवेश ऑनलाईनद्वारे व विद्यापीठाने निश्चित केलेल्या प्रक्रियेद्वारे वेळेत करण्यात यावेत. आपणाकडून यापूर्वीप्रमाणे यावर्षीदेखील सहकार्याची अपेक्षा !

कळावे.

आपला विश्वासू,

**प्रा.(डॉ.) अर्जुन घाटुळे**
***परीक्षा नियंत्रक***

प्रत माहितीसाठी –

1. मा. कुलगुरू, यचममु विद्यापीठ,नाशिक
2. मा. कुलसचिव, यचममु विद्यापीठ,नाशिक
3. मा. संचालक, विद्यार्थी सेवा विभाग, यचममवि, नाशिक
4. मा. संचालक, विभागीय केंद्र, अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे, कोल्हापूर, नांदेड.

**ता.क.**- मा. विभागीय केंद्र संचालकांना नम्र विनंती की, कृपया आपल्या विभागीय केंद्रांतर्गत कार्यरत असलेल्या अभ्यासकेंद्रांना उपरोक्त पत्रातील मुद्यांची माहिती द्यावी व जास्तीत जास्त प्रवेश वेळेत करण्याबाबत प्रोत्साहित करावे ही विनंती. तसेच प्रवेश प्रक्रियेसंदर्भात केंद्रसंयोजकांच्या कार्यशाळेत ह्या पत्रातील मुद्यांसंदर्भात मार्गदर्शन करण्यात यावे.